# अवघ्या चार महिन्यांत प्रवाशांना चांगल्या सुविधा पुरवल्या - प्रताप सरनाईक



**मुंबई :** महायुतीच्या माध्यमातून राज्यात चांगली कामे सुरू आहेत. अवघ्या चार महिन्यांत परिवहन विभागाकडून प्रवाशांना चांगल्या सुविधा पुरवून एसटीला पुढे नेण्याचे काम केले आहे. एसटी कामगार हा आमचा कणा आहे. त्यामुळे एक लाख एसटी कामगारांचे प्रश्न सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

भाजप आमदार प्रवीण दरेकर यांच्या स्थानिक विकास निधीतून उभारण्यात आलेल्या नॅन्सी प्रवासी निवारा व नियंत्रण कक्षाचे सरनाईक तसेच माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रवीण दरेकर यांच्यासह विभाग नियंत्रक पळसकर आदींसह भाजप पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरनाईक म्हणाले, कोकण तसेच पश्चिम महाराष्ट्रातील जनतेला प्रवासासाठी सोयीचे ठरणाऱ्या बोरिवली पूर्व येथील नॅन्सी आणि सुकरवाडी एसटी आगारासाठी पुढील ३ महिन्यांत निविदा काढण्यात येईल. येत्या ३ जून रोजी एसटी कामगार संघटनेची बैठक बोलावली असून या बैठकीत कामगारांच्या हिताचे विविध निर्णय घेतले जाणार आहेत. तर एसटी महामंडळाच्या कामगारांचे प्रश्न मार्गी लागायला हवेत. प्रवासादरम्यान चालक-वाहकांना चांगल्या सुविधा तसेच मुक्कामा ठिकाणी राहण्याची व्यवस्था व्हायला हवी. ३ जूनच्या बैठकीत त्यादृष्टीने सरनाईक निर्णय घेतील, असा विश्वास मंत्री आशिष शेलार यांनी व्यक्त केला. तसेच एसटीच्या अद्ययावतीकरणात आयटी विभागाची मदत लागली तर आपला विभाग तुमच्या खांद्याला खांदा लावून काम करेल, अशी ग्वाही देतानाच एसटी डेपोत मराठी नाट्य व सिनेमांसाठी थिएटर बांधण्याची विनंतीही शेलार यांनी सरनाईक यांना केली.

### एसटी कामगारांचा पगार वेळेत होण्यासाठी प्रयत्न करा - दरेकर

मी एसटी कंडक्टरचा मुलगा असल्याने मला एसटी कामगारांच्या अडचणींची जाणीव आहे. सध्या एसटी कामगारांचा पगार वेळेवर होत नाही. सरकार आपले आहे. त्यादृष्टीने मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करा, एसटी कामगारांचा पगार वेळेत आणि सुरक्षित कसा होईल, याची काळजी घ्यावी, अशी विनंती प्रवीण दरेकर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना केली. तसेच नॅन्सी एसटी डेपोतून कोकणात एसटीच्या १५० हून अधिक, तर पश्चिम महाराष्ट्रात ७०-८० फेऱ्या होत असतात. त्यामुळे प्रवासी व कामगारांसाठी त्या दृष्टीने सर्व सुविधा असलेले आणि मुंबई व बोरिवलीला साजेसे असे नॅन्सी बस स्थानक विकसित करण्यासाठी शासन स्तरावर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही यावेळी दरेकर यांनी व्यक्त केली.

# मध्य रेल्वेद्वारे आषाढी एकादशीची तयारी

## मध्य रेल्वे महाव्यवस्थापकांची सोलापूर विभागाची सविस्तर पाहणी



**मुंबई :** मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांनी ९ मे रोजी सोलापूर विभागाची सविस्तर पाहणी केली; ज्यामध्ये आगामी आषाढी यात्रेसाठी सुरक्षितता, सुरक्षा आणि तयारी यावर लक्ष केंद्रित केले गेले.

६ जुलै रोजी सर्वत्र मोठ्या आनंदात आषाढी एकादशी साजरी करण्यात येणार आहे. रेल्वे, एसटी, पायी वारीद्वारे लाखो विठ्ठल भक्त पंढरपूर येथे दाखल होतात. याच पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने सोलापूर विभागाची पाहणी केली आहे. पंढरपूर मंदिर परिसरात राज्य अधिकारी आणि विभागीय रेल्वे अधिकाऱ्यांसह एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यात आषाढी तयारीच्या प्रमुख बाबींवर चर्चा करण्यात आली, ज्यात रेल्वे रुळांलगत/पलीकडे पालखींची सुरक्षित वाहतूक, होल्डिंग एरियाची तरतूद, शौचालय सुविधा, प्रवासी माहिती प्रणालीमध्ये वाढ, सीसीटीव्ही देखरेख, मंदिर संकुलातून भाविकांची सुलभ मूव्हमेंट आणि रेल्वे स्थानके आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यांच्यातील कनेक्टिव्हिटी यांचा समावेश होता. प्रत्येक उपक्रमाच्या वेळापत्रकावर चर्चा करण्यात आली तसेच मागील वर्षाच्या तुलनेत सेवा वाढवण्याच्या योजनांवर चर्चा करण्यात आली.

### गर्दी कमी करण्यासाठी उपाययोजना




महाव्यवस्थापकांनी टिकेकरवाडी गँग हटमधील वाहतूक सुविधेच्या कामांचा आढावा घेतला आणि क्षेत्रातील शाखा अधिकाऱ्यांशी संवाद साधला. सोलापूरच्या जवळ असल्याने आणि सोलापूर स्थानकावरील गर्दी कमी करण्यासाठी सुविधा विकसित करण्याची क्षमता यावर भर दिला. तपासणीदरम्यान, मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी सोलापूर विभागात क्षमता वाढवणे, लवचिकता वाढवणे आणि कॉमन लूप, होल्डिंग लाईन्स आणि द्वि-दिशात्मक सिग्नलिंगसाठी रेल्वे जमिनीचा वापर करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. टिकेकरवाडी स्थानकावर सिग्नलिंग गीयर आणि कागदपत्रांची अनियोजित तपासणी देखील करण्यात आली.

# निवडणूक आयुक्तांचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाशी संवाद




**मुंबई :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू व डॉ. विवेक जोशी यांनी आज मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या (सीपीआय - एम) महासचिव एम. ए. बेबी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाशी दिल्लीतील निर्वाचन सदन येथे संवाद साधला. हा संवाद आयोगाद्वारे राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांच्या अध्यक्षांशी सुरू असलेल्या चर्चेच्या मालिकेचा एक भाग असून या संवादाद्वारे पक्षाध्यक्षांना आपल्या सूचना थेट आयोगापर्यंत पोहोचवण्याची ही एक महत्त्वाची संधी ठरणार आहे.

निवडणूक प्रक्रियेचे बळकटीकरण अधिक प्रभावीपणे करणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट असून सर्व संबंधित घटकांच्या सहभागाने विद्यमान कायदेशीर चौकटीत निवडणूक प्रक्रिया अधिक मजबूत बनवण्याचा हा प्रयत्न आहे. याआधी, आयोगाने बहुजन समाज पार्टीच्या (बसप) नेत्या मायावती यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाशी ६ मे २०२५ रोजी आणि भारतीय जनता पार्टीचे (भाजप) अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाशी ८ मे २०२५ रोजी भेट घेतली होती. आतापर्यंत एकूण ४ हजार ७१९ सर्वपक्षीय बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. यात मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी ४० जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी ८०० आणि मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी ३ हजार ८७९ बैठकांचे आयोजन केले असून या माध्यमातून २८ हजारांहून अधिक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

# दैनिक राशी भविष्य

**सौ. स्वप्ना अवसरे-पवार**
सातारा. मोबाईल : ९८२२३०३०५४

**मेष :** आज तुमचा सर्वत्र प्रभाव असणार आहे. कामाचा उरक राहील दैनंदिन कामे सहजपणे पूर्ण होतील. आज तुम्ही विशेष उत्साही राहाल. प्रवास सुखकर होणार आहेत. मनोबल उत्तम राहील.

**वृषभ :** कामाचा ताण जाणवणार आहे. आज तुमचे मन एखाद्या बाबतीत साशंक राहील. अनावश्यक कामात वेळ वाया जात असल्याने आपली चिडचिड होणार आहे. आज शक्यतो प्रवास करण्याचे टाळावे.

**मिथुन :** आज आपणाला विविध लाभ होणार आहेत. तुमचे मानसिक व वैचारिक परिवर्तन होणार आहे. आज तुम्ही कामामध्ये व्यस्त राहणार आहात. काहींना अनपेक्षितपणे धनलाभ होणार आहेत.

**कर्क :** तुमचा इतरांवर प्रभाव राहील. आज आपण आनंदी व आशावादी राहणार आहात. आपल्यावर असणारी जबाबदारी आज आपण योग्य रीतीने पार पाडणार आहात. आपल्याला अनेक बाबतीत अनुकूलता राहील.

**सिंह :** आज आपल्याला अनपेक्षितपणे प्रवास करावा लागेल. आपले मनोबल व आत्मविश्वास उत्तम राहील. आपल्यावर कामाचा ताण राहणार आहे. मानसिक स्वास्थ्य लाभेल. उत्साही व आनंदी राहणार आहात.

**कन्या :** काहींना अनपेक्षित धनलाभ होणार आहे. आपल्याला कौटुंबिक जीवनाचा आनंद मिळेल. आर्थिक कामे योग्य रीतीने पार पडणार आहेत. कुटुंबातील व्यक्तींसाठी वेळ देऊ शकणार आहात. आनंदी राहाल.

**तुळ :** आपले मनोबल वाढणार आहे. प्रवास सुखकर होतील. आपल्याला मानसिक प्रसन्नता लाभणार आहे. वैवाहिक जीवनात सुसंवाद राहणार आहे. आपण आज इतरांना मदत करणार आहात.

**वृश्चिक :** आपले कोणीच नाही, ही भावना आज आपल्याला त्रस्त करेल. आज आपण कोणाच्याही सहकार्याची अपेक्षा करू नये. काहींना नैराश्य जाणवेल तर काहीजण धार्मिक कार्यात रममाण होणार आहेत.

**धनु :** मुला-मुलींच्या प्रगतीकडे विशेष लक्ष देणार आहात. आनंदी व आशावादी राहणार आहात. मानसिक स्वास्थ्य उत्तम राहील. काहींना अनपेक्षितपणे आर्थिक लाभ होणार आहेत. अनेकांचे सहकार्य लाभेल.

**मकर :** तुमचा इतरांवर प्रभाव असणार आहे. आज तुम्ही आपली मते परखडपणाने मांडणार आहात. आपल्या विचारावर ठाम राहाल. आपले मनोबल व आत्मविश्वास उत्तम असणार आहे. प्रवास सुखकर होणार आहेत.

**कुंभ :** काहींना अनपेक्षितपणे प्रवास करावा लागणार आहे. आपले मनोबल व आत्मविश्वास उत्तम असणार आहे. आपल्यावर कामाचा ताण राहील मात्र आपण कामे पूर्ण करणार आहात. जिद्दीने कार्यरत राहाल.

**मीन :** आज आपल्याला मानसिक अस्वस्थता सतावणार आहे. कामामध्ये लक्ष लागणार नाही. आपल्यावर कसलातरी अनावश्यक ताण राहणार हे. मनाविरुद्ध एखादी घटना घडल्याने तुमचे मन नाराज राहील.

# वेटलिफ्टिंगमध्ये यश खंडागळेला सुवर्ण



**राजगीर :** वेटलिफ्टिंगमधील महाराष्ट्राचा सुवर्णपदकाचा धडाका ७ व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत कायम राहिला. सांगलीच्या यश खंडागळेने ६७ किलो गटात सुवर्णपदक पटकावले. तर, टेनिसमधील एकेरीत महाराष्ट्राच्या अर्णव पापरकर, ऐश्वर्या जाधव यांनी उपांत्य फेरीत धडक मारली.

खंडागळेने स्नॅच प्रकारात १२२ किलोची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. पाठोपाठ क्लीन अ‍ॅण्ड जर्क प्रकारातही पहिल्याच प्रयत्नात त्याने १४५ किलो वजन पेलले. स्नॅच व क्लीन अँड जर्क प्रकारात दुसऱ्या व तिसऱ्या प्रयत्नात अधिक वजन उचलण्यात तो अपयशी ठरला. पहिल्याच प्रयत्नात सर्वोत्तम कामगिरी करत एकूण २६७ किलो वजनाची खेळी करत त्याने सुवर्णपदकाला गवसणी घातली.

टेनिसमध्ये उपांत्यपूर्व लढतीत महाराष्ट्राच्या अर्णव पापरकर याने दिल्लीच्या रियान शर्माला ७-६, ६-२ असे सरळ सेटमध्ये नमवले. मुलींच्या एकेरीतही महाराष्ट्राच्या ऐश्वर्या जाधवने कर्नाटकच्या कशवी सुनीलला ६-३, ६-२ असे सेटमध्ये नमवत उपांत्य फेरीत धडक मारली. मुलींच्या दुहेरीतही ऐश्वर्या जाधव व आकृती सोनकुसारे जोडीने उपांत्य फेरी गाठली.

# कार्तिकेयन, राऊत चौथ्या स्थानावर

**अल ऐन :** भारतीय ग्रँडमास्टर मुरली कार्तिकेयन आशियाई वैयक्तिक ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत चौथ्या स्थानावर राहिला, तर महिलांत पद्मिनी राऊत चौथ्या स्थानावर राहून भारतीय बुद्धिबळपटूंमध्ये अव्वल ठरली. रशियाच्या रुडिक मकरियन, कार्तिकेय आणि भारताच्या निलाश साहाचे प्रत्येकी सात गुण होते; परंतु टायब्रेक स्कोअरच्या आधारे मकरियनला तिसरे स्थान मिळाले. कार्तिकेय चौथ्या आणि साहा पाचव्या स्थानावर राहिले.


## निडो होम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०

**ई-लिलाव - वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची ''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर'' व ''जशी आहे जी आहे तत्त्वावर'' विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही कर्जदार, सहकर्जदार व हमीदार यांच्याद्वारे प्राप्त कर्जाकरिता **मे. निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तीचा प्रत्यक्ष ताबा आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सहकर्जदार/हमीदाराचे नाव | वसुली रक्कम | राखीव मूल्य व इरठे | लिलाव दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | गणेश महादेव राजोळी (कर्जदार) व शीतल गणेश राजोळी (सहकर्जदार) | एलएएन नं. : एलएमयूएमएसटीएल००००३९६३७ करिता दि. १०.०५.२०२५ रोजीनुसार रक्कम रु. १२,७३,३९१.३४ (रु. बारा लाख त्र्याहत्तर हजार तीनशे एक्याण्णव व चौतीस पैसे मात्र) + त्यावरील पुढील व्याज + कायदेशीर खर्च. | रु. १९,२८,५२०/- (रु. एकोणीस लाख अठ्ठावीस हजार पाचशे वीस मात्र) इसारा रक्कम ठेव : रु. १,९२,८५२/- (रु. एक लाख ब्याण्णव हजार आठशे बावन्न मात्र) | ०५.०६.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० या वेळेत (५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासमवेत) |
| परीक्षण दिनांक व वेळ : दि. २८.०५.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. ३.०० या वेळेत | | | प्रत्यक्ष ताबा दिनांक : २१.०२.२०२५ | |

**प्रतिभूत संपत्तीचे विवरण :** पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : फ्लॅट क्र. २११, दुसरा मजला, ''सी'' विंग, ''मातोश्रीनगर'' नावाने ज्ञात इमारतीतील, एन. ए. नं. १-डी, प्लॉट क्र. २६, सिटी सर्व्हे क्र. ५३९९ ते ५५२६, ५५८६ ते ५५९७, ५६८५ ते ५७२६ धारक एनए (बिगरशेतजमीन) जमिनीवर निर्मित, फ्लॅट क्षेत्र मोजमापित साधारण ४५.२७ चौ. मी., विभाग क्र. २/१, मनपा घर क्र. ४८२४/२११, गाव कोहोज, खुंटवली, वंदना टॉकीजजवळ, विमको नाका, अंबरनाथ (प.), तालुका अंबरनाथ, जि. ठाणे, तालुका व उपजिल्हा नोंदणीकरण उल्हासनगर, उपजिल्हा नोंदणीकरण ठाणे व अंबरनाथ महानगरपालिका हद्दीतील.

**टीप :** १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई-मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर ''ऑनलाइन ई-लिलावात'' सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
लाभार्थी नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड,
बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.
३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : ०४.०६.२०२५.
४. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा **श्री. मौलिक श्रीमाली यांना दूर. क्र. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७**, हेल्पलाइन ई-मेल आयडी : Support@auctiontiger.net येथे व्यक्तिश: संपर्क साधावा.

मोबाइल क्र. : ९००४३५९८३५/९७६८७४६६२४
दिनांक : १२.०५.२०२५

सही/- प्राधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)


# भारतीय महिला संघाला जेतेपद

**| त्रिकोणी एकदिवसीय मालिकेत श्रीलंकेवर सरशी**
**| मंधानाचे शानदार शतक | राणा-कौरचा प्रभावी मारा**




**सामनावीर : स्मृती मंधाना : ११६ धावा**
**मालिकावीर : स्नेह राणा : १५ बळी**

- एका वर्षात चार वेळा तीनशेहून अधिक धावा उभारणारा भारत न्यूझीलंडनंतरचा दुसरा संघ ठरला.
- भारताची ७ बाद ३४२ ही एकदिवसीय प्रकारातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील पाचवी सर्वोच्च धावसंख्या ठरली.
- महिला क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावणाऱ्या फलंदाजांच्या पंक्तीत स्मृती मंधाना (११) तिसऱ्या क्रमांकावर उभी आहे. ऑस्ट्रेलियाची मॅग लॅनिंग १५ शतकांनी आघाडीवर असून त्यानंतर न्यूझीलंडच्या सुझी बेट्सचा (१३) क्रमांक लागतो.

**कोलंबो :** उपकर्णधार स्मृती मंधानाचे (११६) शानदार शतक आणि स्नेह राणा (३८ धावांत ४ बळी) व अमनज्योत कौरच्या (५४ धावांत ३ बळी) प्रभावी माऱ्यावर भारतीय संघाने त्रिकोणी एकदिवसीय मालिकेचा किताब पटकावला. अंतिम फेरीत मंधानाच्या शतकावर भारताने एकदिवसीय प्रकारातील (७ बाद ३४२) धावांचे शिखर गाठले. विशाल धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंकेकडून कर्णधार चमारी अट्टापटू (५१) सोबत मधल्या फळीतील फलंदाजांनी दिलेली झुंज अपुरी पडली आणि भारताने ९७ धावांनी सरशी साधली.

प्रतिका रावलने (३० धावा, २ चौकार) आणि मंधानाने १५ षटकांत ७० धावांची सलामी दिली. मंधानाने त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावरील हर्लिन देओलला सोबत घेत धावसंख्येत भर घातली. मंधानाने ५५ चेंडूंत अर्धशतक आणि ९२ चेंडूंत कारकीर्दीतल्या अकराव्या शतकाला गवसणी घातली. मंधानाने आपल्या शतकी खेळीत १५ चौकार, २ षटकार लगावले. मंधाना-देओलने दुसऱ्या गड्यासाठी १२० धावा जोडल्या. देओल ४७, कर्णधार कौर ४१ आणि जेमिमा रॉड्रिग्जने ४४ धावांचे योगदान दिले. तळाचे फलंदाज अमनज्योत कौर (१८) आणि दीप्ती शर्माने नाबाद २० धावांची भर घातली.

आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेला पहिल्याच षटकत अमनज्योतने धक्का देत हसिनी परेराच्या (०) यष्ट्या उद्ध्वस्त केल्या. विश्मी गुणरत्ने (३६), कर्णधार अट्टापटू (५१), निलक्षिका सिल्वा (४८), हर्षिता समरविक्रमा (२६) या प्रमुख फलंदाजांना रोखण्यात भारतीय गोलंदाज यशस्वी ठरले. सिल्वा आणि समरविक्रमा खेळपट्टीवर उभे असेपर्यंत सामन्यात रंजक परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, दोघीही परतल्यानंतर श्रीलंकेचा डाव २४५ धावांवर आटोपला.

**| क्रीडा |**

# दीपिकाला कांस्यपदक

## तिरंदाजी विश्वचषक स्पर्धा



**शांघाय :** भारताची सर्वात यशस्वी तिरंदाज दीपिका कुमारीने तिरंदाजी विश्वचषकाच्या दुसऱ्या टप्प्यात कांस्यपदकाला गवसणी घातली. दीपिकामुळे भारताची तालिकेतील पदक संख्या ६ पर्यंत पोहोचली आहे.

उपांत्य फेरीतील रिकर्व्ह वैयक्तिक प्रकारात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावरील दक्षिण कोरियाची लिम सिह्योनकडून ७-१ असा दीपिकाला पराभव स्वीकारावा लागला. मात्र, त्यानंतरच्या कांस्यपदकाच्या लढतीत आणखी एक कोरियन खेळाडू कांग चेन योंगविरुद्ध ७-३ असा विजय मिळवून दीपिकाने कांस्यपदक निश्चित केले. ऑलिम्पिक चॅम्पियन सिह्योनने गत वर्षी विश्वचषकातही दीपिकाचा शेवटच्या चारमध्ये पराभव केला. पहिला सेट २७-२७ असा बरोबरीत सुटला; परंतु दीपिकाने दुसऱ्या सेटमध्ये २८ गुण मिळवून ३-१ अशी आघाडी घेतली. तथापि, कांगने पुनरागमन केले आणि दीपिकाच्या २७ विरुद्ध ३० गुणांसह ३-३ अशी बरोबरी साधली. दीपिकाने अनुभव पणाला लावत १० गुणांची कमाई करत ५-३ अशी आघाडी घेतली. त्यानंतर अखेरच्या सेटमध्ये २८ विरुद्ध २९ गुण मिळवून आपला विजय निश्चित केला.


## जाहीर सूचना

ICICI Bank
नोंदणीकृत कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर, चकली सर्कलजवळ, जुना पदरा रोड, वडोदरा-३९० ००७.
प्रशासकीय कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई-४०० ०५१.

**सोने लिलाव तथा आमंत्रण सूचना**

आयसीआयसीआय बँक लिमिटेड (''आयसीआयसीआय बँक'') यांच्याकडून सोन्याच्या दागिन्यांच्या समक्ष घेतलेल्या कर्ज सुविधेची (''सुविधा'') त्यांची थकबाकी रक्कम जमा करण्यासाठी खालील नमूद कर्जदारांना सूचना वितरित करण्यात आली आहे. ते थकबाकीची परतफेड करण्यास असमर्थ राहिल्यामुळे आम्हाला **२२ मे २०२५** रोजी तारण असलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करावा लागत आहे. आयसीआयसीआय बँकेला कोणतीही पूर्वसूचना न देता खाते काढून घेण्याचा/लिलावाची तारीख बदलण्याचा अधिकार आहे. सदर लिलाव https://Jewel-auction.procuretiger.com वर **दु. १२.३० वा. ते दु. ३.३० वा.** दरम्यान ऑनलाइन करण्यात येईल. सविस्तर अटी व शर्तींसाठी कृपया संकेतस्थळावर लॉग इन करा. मयत कर्जदाराच्या प्रकरणामध्ये कायदेशीर वारसदाराला सर्व अटी लागू राहतील.

| कर्ज खाते क्र. | ग्राहकाचे नाव |
|---|---|
| शाखेचे नाव : बदलापूर | |
| २७८७६२००३१२७ | सचिन शंकर कडू |
| २७८७६२००३६७७ | वैशाली पंडित पाटील |
| शाखेचे नाव : बहुल | |
| ६४८२६२००६४४२ | नीलेश नामदेव डुकरे |
| शाखेचे नाव : बारामती | |
| ११०६६२०२१९७९ | किशोर माणिकराव साळुंखे |
| शाखेचे नाव : बार्शी | |
| १०९९६२०१७७७५ | गोविंद विष्णू बोराडे |
| शाखेचे नाव : भवानीनगर | |
| २९३५६२००३४६१ | रोहित बाळासो. रणनवरे |
| शाखेचे नाव : भिगवण | |
| ३५२३६२००६९३७ | लालासाहेब किसन झोल |
| शाखेचे नाव : छ. संभाजीनगर-पुंडलिकनगर | |
| १४५६६२००२९१० | सय्यद नासीर सय्यद अझर हुसैनी |
| शाखेचे नाव : दासगाव | |
| ६४२१६२००३७१९ | रमेश येतू जाधव |
| शाखेचे नाव : दौंड | |
| १७२३६२०११२५० | समाधान तुळशीराम कसबे |
| शाखेचे नाव : दिंडोरी | |
| १४६८६२०१८०२२ | किरण भास्कर मुरकुटे |
| शाखेचे नाव : डोंबिवली-एमआयडीसी | |
| ००८८६२००९३३८ | मीनल विकास नेवलकर |
| ००८८६२००९३४७ | संतोष रामकेशर शर्मा |
| शाखेचे नाव : डोंबिवली पश्चिम | |
| १४८९६२००१७१४ | ओम प्रकाश यादव |
| १४८९६२००३३२९ | प्रिया दिलीप राव |
| शाखेचे नाव : डोंबिवली-शिळ फाटा | |
| ३४०४६२००२६८९ | महेशकुमार अरुमुघम |
| शाखेचे नाव : गंगापूर | |
| ३७६५६२००१७५७ | कल्याण अप्पादेव शेजूळ |
| शाखेचे नाव : घेराडी | |
| ६४८१६२००८३५१ | लक्ष्मण ज्ञानू मेटकरी |
| शाखेचे नाव : हडपसर | |
| ३३६२६२००२२४७ | किशोर बाबूराव वरवंटे |
| शाखेचे नाव : इंदापूर | |
| १४७३६२०१०९३९ | तानाजी भैरवनाथ व्यवहारे |
| १४७३६२०१५७९३ | समाधान ईश्वर तांबे |
| १४७३६२०१७३४० | सचिन वामन जाधव |
| शाखेचे नाव : कळंबोली | |
| २७७९६२००३२६४ | टीना दत्तू |
| शाखेचे नाव : काल्हेर | |
| ३५२५६२००१४८२ | सचिन सुंदर तांबे |
| शाखेचे नाव : कामशेत | |
| ७२१९६२००१५६० | गजानन वाघू घारे |
| शाखेचे नाव : कन्नड | |
| ३७५४६२००३३८४ | संजय कारभारी खरे |
| शाखेचे नाव : करंजेपूल | |
| ३११८६२००३१०५ | मयूर जालिंदर शेंडकर |
| शाखेचे नाव : करमाळा | |
| ३७५३६२००६०४६ | गौरव रामदास गावडे |
| शाखेचे नाव : खोपोली | |
| १४८०६२००३९६६ | दीपाली अनंत संगारे |
| शाखेचे नाव : माचनूर | |
| २९३९०५००१८०४ | भास्कर गोपीनाथ कसबे |
| २९३९६२००१७७९ | अमागोंडा महादेव पुजारी |
| शाखेचे नाव : महाड | |
| ६४२२६२०१३५५१ | विजय मारुती पवार |
| ६४२२६२०१४३४९ | असजाद उस्मान खान म्हैसकर |
| शाखेचे नाव : मालेगाव | |
| ६४२८६२००५२४० | नितू रवींद्र शेवाळे |
| ६४२८६२००५२५१ | नितू रवींद्र शेवाळे |

| कर्ज खाते क्र. | ग्राहकाचे नाव |
|---|---|
| शाखेचे नाव : मंगळवेढा | |
| ६४४६६२०१४४०१ | नाना हरिबा कोळेकर |
| शाखेचे नाव : मीरा-भाइंदर रोड | |
| १७२८६२००३१६६ | जेम्स फर्नांडिस |
| शाखेचे नाव : मुंबई-अंधेरी महाली गुंफा रोड | |
| ४२८९६२००१५६० | रमेश जगन्नाथ शेडगे |
| शाखेचे नाव : मुंबई-कांजूरमार्ग | |
| ३४४७६२००१७१९ | जुई रॉय |
| शाखेचे नाव : मुंबई-कस्तूर पार्क | |
| १२२२६२००२५१५ | सुनंदा आनंद खांडझोडे |
| शाखेचे नाव : मुंबई-अंधेरी विशाल हॉल | |
| ६९७७६२६०३२५२ | विलास श्रीकांत सावंत |
| शाखेचे नाव : मुंबई-बोरिवली शिंपोली | |
| १२२८६२००२१६४ | नितीन चंदरप्रकाश कुमार |
| शाखेचे नाव : मुंबई-चांदिवली | |
| १०२२६२०१२१९८ | निरंजन पगडे |
| शाखेचे नाव : मुंबई-घाटकोपर | |
| ००२६६२०१७१०६ | रेश्मा प्रकाश दुधाने |
| शाखेचे नाव : मुंबई-जोगेश्वरी पूर्व | |
| १२३६६२००४१५० | मोयुसुफ मोहारुण शेख |
| शाखेचे नाव : मुंबई-कांदिवली ठाकूर व्हिलेज | |
| ०२६७६२००६७१९ | रविकेश यादव |
| शाखेचे नाव : मुंबई-लोखंडवाला मार्केट | |
| ६९९१६२६०१८१८ | संदीप दास |
| शाखेचे नाव : मुंबई-महापे | |
| ०५६४६२००७१६८ | राहुल जाधव |
| शाखेचे नाव : मुंबई-मालाड एस. व्ही. रोड | |
| ६९८६६२६०२७१२ | शैलेश प्रभू |
| शाखेचे नाव : मुंबई-मरोळ | |
| १०४४६२००६९२८ | रंजना केशवनकर |
| शाखेचे नाव : मुंबई-विक्रोळी पश्चिम | |
| १०४५६२००४३०० | भावना विक्रम कुमार |
| शाखेचे नाव : मुंबई-झवेरी बाजार | |
| ०२६१६२०११७४० | झाकी अमजद खान |
| शाखेचे नाव : नाशिक-आडगाव नाका | |
| ३४५५६२०००६४२ | प्रफुल्ल नारायण मेंगाणे |
| शाखेचे नाव : नाशिक-पाथर्डी फाटा | |
| १०८७६२००४७८९ | अश्विनीकुमार मनसुखलाल मेशिया |
| १०८७६२००२९३२ | अमित अशोक वाघमारे |
| शाखेचे नाव : नाशिक-बोधलेनगर | |
| १८६८६२००२५६५ | सतीश विठ्ठल ठाकरे |
| शाखेचे नाव : नाशिक-कॉलेज रोड | |
| १८७०६२००१४४७ | अश्विनी मुरलीधर मिस्त्री |
| शाखेचे नाव : नाशिक-सेरेने मेडोज | |
| ५५९४६२०००००१ | राजू रामाप्पा म्हेत्रे |
| ५५९४६२०००००२ | नाविद युनूस शेख |
| शाखेचे नाव : नाशिक-तिडके कॉलनी | |
| १८७३६२००२५६२ | आकांक्षा सुभाष बोरसे |
| १८७३६२००२५२५ | सचिन शेवाळे |
| शाखेचे नाव : नाशिक-पंचवटी | |
| ०९९९६२००५२०२ | अश्विनी शर्मा |
| शाखेचे नाव : पाली (रायगड) | |
| ४८५७६२०००१३१ | संदेश साधुराम महाबळे |
| शाखेचे नाव : पनवेल | |
| ०३३४६२००६२११ | आयुष योगेश शर्मा |
| ०३३४६२००६३०१ | आयुष योगेश शर्मा |
| शाखेचे नाव : पनवेल-खांदा कॉलनी | |
| ७९२८६२०००२९७ | रेहाना मुनीर शेख |
| शाखेचे नाव : पुणे-औंध नागरदास रोड | |
| १८७८६२००१०९५ | पल्लवी राजीव गोयल |
| १८७८६२००२६३३ | वेलुरी जनार्दन रेड्डी |

| कर्ज खाते क्र. | ग्राहकाचे नाव |
|---|---|
| शाखेचे नाव : पुणे-धानोरी | |
| ३९७७६२००१०७४ | सतीश अनंतराव चव्हाण |
| शाखेचे नाव : पुणे-सहकारनगर | |
| ३६९२६२००२८२१ | महेंद्र भुरा भरसादिया |
| शाखेचे नाव : पुणे-थर्मेक्स चौक | |
| २३८७६२००५४५४ | स्वप्नील परशुराम सातपुते |
| शाखेचे नाव : पुणे-टिळक रोड | |
| १८७५६२००१९४० | अंजू जी. चौरसिया |
| शाखेचे नाव : पुणे-कोंढवा | |
| ००७४६२०१२१९७ | सिराज मोहम्मद रईस खान |
| शाखेचे नाव : पुणे-मोहम्मदवाडी | |
| २३९२६२०००३०३ | श्वेता गंग |
| शाखेचे नाव : पुणे-न्यू सांघवी | |
| ३३६८६२००३०१७ | ओमकार लिंगे |
| शाखेचे नाव : पुणे-शिवाजीनगर | |
| ००३९६२०३०२६७ | रवींद्र किसन कुटे |
| शाखेचे नाव : पुणे-सिंहगड रोड | |
| १८०२६२००५७२२ | संदीप धोंडीराम पवार |
| शाखेचे नाव : पुणे-विमाननगर | |
| ०९१५६२००६३११ | मोनेशा चौबे महंता |
| शाखेचे नाव : पुणे-वाघोली | |
| १७२७६२००२९८६ | अर्णव चटर्जी |
| शाखेचे नाव : सफाळे | |
| ४९१०६२००००७८ | भावेंद्र झा |
| शाखेचे नाव : शिरूर | |
| १७२४६२००९५६० | सोन्याबापू तुकाराम टाकळे |
| शाखेचे नाव : सिन्नर | |
| ०४९१६२००८०५८ | योगेश काशिनाथ कुटे |
| ०४९१६२००९८१८ | दत्तात्रय तात्या खैरे |
| ०४९१६२००९९०२ | माधवी राजेंद्र जाधव |
| शाखेचे नाव : सोलापूर-नॉर्थ कसबा | |
| २५२५६२००५४०६ | सरिता सीताराम कुलकर्णी |
| शाखेचे नाव : ठाणे-कोलशेत रोड | |
| १८८८६२००२७३३ | रोहन यशवंत सावंत |
| शाखेचे नाव : ठाणे-आरएमआर | |
| ००३५६२०१९४५८ | निवेदिता सेन |
| शाखेचे नाव : ठाणे-वागळे इस्टेट | |
| १८८७६२००३७४५ | किरण सुरेश विश्वकर्मा |
| शाखेचे नाव : ठाणे-नालासोपारा पूर्व | |
| १५६९६२००४०७६ | टिळक रतन चौहान |
| शाखेचे नाव : ठाणे-वसई | |
| ००२२६२००६२८१ | प्रियांका ठाकूर |
| शाखेचे नाव : त्रिंबक | |
| २८०१६२००२६०४ | बबलू शंकर शिंदे |
| शाखेचे नाव : उल्हासनगर | |
| १०६६६२००४७३० | मनीष नंदलाल पंजाबी |
| शाखेचे नाव : वैराग | |
| २०३०६२००७९४४ | सागर कृशांत क्षीरसागर |
| शाखेचे नाव : विरार पूर्व | |
| ३४०९६२०००३५४ | आकाश अरुण पुरंदरे |
| ३४०९६२००३१३६ | जयेश नरेश माळी |
| शाखेचे नाव : बंगलोरे-एईसीएस लेआऊट सिंगासांद्रा | |
| ३९५२६२०००९५६ | पुष्पा हनुमंता राठोड |
| शाखेचे नाव : देवराई | |
| ०६६४६२००२००७ | संतोष ओझा |
| शाखेचे नाव : हुबळी-गोकुळ रोड | |
| १४२६६२००४५१६ | रेश्मा वैभव जाधव |
| शाखेचे नाव : रांची-कोकर | |
| ४८६२६२००००४४ | प्रदीप कुमार तिवारी |
| शाखेचे नाव : वडोदरा-गोत्री रोड | |
| १८४१६२००११९६ | हितेन प्रवीणचंद्र दवे |

दिनांक : १२.०५.२०२५
स्थळ : मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगड, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक

हस्ता./-
प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय बँक लिमिटेडकरिता